
युटा मराठी मंडळाचे साहित्यिक त्रैमासिक
आरंभ
Aarambh Utah Marathi Mandal Magazine
वर्ष पहिले, अंक पहिला
१८ मार्च २०१८

युटा मराठी मंडळ समिती २०१८-२०१९

अध्यक्षा - अर्चना यादव

उपाध्यक्ष - महेश चव्हाण

कोषाध्यक्षा - प्राची अष्टपुत्रे

सदस्य

सोनाली गोडबोले	मोनल श्रीगोंदेकर
अमित श्रीगोंदेकर	राजेश शिवेकर
रोहित सोनावाले	शौनक सोनटक्के
श्रीवास अष्टपुत्रे	

'आरंभ' त्रैमासिक संपादक मंडळ

श्रीवास अष्टपुत्रे

अमित श्रीगोंदेकर

अर्चना यादव

मुखपृष्ठ संकल्पना व मांडणी - हेमंत गोरे

विशेष सहाय्य -

मिलिंद झोडगे

तपस्या भार्गवे

अनुक्रमणिका

संपादकीय
यु म मं अध्यक्षांचे मनोगत
शीर्षक आणि मुखपृष्ठ - माहिती

ललितलेखन

1. युटा, मराठी आणि मंडळ - अर्चना यादव
2. मराठी नुतन वर्ष: गुढीपाडवा' - तपस्या भार्गवे
3. आईस पत्र - अमित श्रीगोंदेकर
4. बंड्या बोपर्डीकर: व्यक्तिचित्र - श्रीवास अष्टपुत्रे
5. नक्षत्रांचे देणे: कविवर्य मंगेश पाडगांवकर - श्रीकांत अग्निहोत्री

आरोग्य

1. East comes west - संतोष माकणीकर
2. आयुर्वेद काय सांगते- अंजली कुलकर्णी
3. Healthy Burger Recipe - प्रिती माकणीकर

कविमन

1. आम्हाला काय येते - मेघा शिवेकर
2. बघ जरा वाचून - अभिज्ञा पाठारकर
3. A journey on the spiritual path - अभिज्ञा पाठारकर
4. जिंदगी का पथ - मिलिंद झोडगे

बालविश्व

1. Einstein Painting - Sidhant Patwardhan
2. Fairy (painting) - Trisha Patwardhan
3. Sharpie drawings - Shravya Harnekar
4. Paintings - Anjali Sutar
5. Paintings - Ishika Sutar
6. Short writeup about UMM - Ishika Sutar
7. गणितातील गमती जमती- आकाश कुलकर्णी
8. ओळखा पाहू - ओजस कुलकर्णी

संपादकीय

माझ्या मराठीची बोलू कौतुके।
परि अमृतातेंहि पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन ।।
-संत ज्ञानेश्वर

संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेवर असलेलं नितांत प्रेम व्यक्त करताना म्हटलंय, माझ्या मराठी भाषेत इतका गोडवा आहे की ती अमृताला देखील पैजेने हरवेल.

अनेक कवींनी, संतांनी, लेखकांनी मराठी वाङ्मयात जी भर घातली, त्यातूनच मराठी भाषा समृद्ध झाली. कुसुमाग्रज, मंगेश पाडगांवकर, गदिमा, बहिणाबाई सारख्या कविंनी, संत तुकाराम, नामदेव, चोखामेळा, ज्ञानेश्वरांनी रचलेल्या अभंगाने, आणि पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, आचार्य अत्रे, राम ग. गडकरी, वि. स. खांडेकर अशा काही दिग्गजांमुळेच पुढे मराठी सजली, फुलली, आणि बहरली.

मराठी मासिक हे आपल्या मातीशी आणि भाषेशी तुटलेली नाळ जोडण्याचा अथवा भक्कम करण्याचा एक प्रयत्न. US मध्ये वाढणाऱ्या नव्या मराठी पिढीला आपल्या भाषेची गाठ-भेट करून देण्याचा हा एक प्रयत्न. आपल्यापैकी बऱ्याच जणांना करिअर, शिक्षण आणि मुलांच्या मागे धावतांना म्हणावी तितकी लिखाणाची संधी नसेल मिळाली. आता कदाचित तुमच्याकडे वेळ असेल, अश्या फावल्या वेळात तुमच्यात दडलेल्या कलारूपी व्यक्तिमत्वाला साद घालण्याचा हा एक प्रयत्न. आजकाल ह्या whatsapp आणि facebook च्या जगात, थेट मनातून कागदावर उतरवलेल्या लिखाणाची ऊब दुसऱ्याने एकीकडून उचलून दुसरीकडे “फॉरवर्ड” केलेल्या संदेशातून कशी मिळणार? “दिसामाजी काहीतरी ते लिहावे । प्रसंगी अखंडित वाचीत जावे” ह्या समर्थ रामदासांच्या उपदेशातून सुद्धा लिहिण्याचे महत्व कळते. शेवटी काय तर, तुम्हाला लिखाणासाठी प्रवृत्त करण्याचा एक इवलासा प्रयत्न.

माझ्या शाळेत मराठीच्या परीक्षेत, मी निबंध नेहमी शेवटच्या वीस मिनिटात लिहायचो (नाईलाज बाकी काही नाही, फापटपसारा लिहिण्यात मी खूप वेळ घालवायचो.) आणि त्यावेळात दिलेल्या पर्यायांपैकी एक विषय निवडून, त्यावर जो कल्पना विलास चालायचा, तो खूप मजेशीर असायचा, त्या ओघवत्या विचारांना कागदांवर उतारावतांना एक वेगळाच आनंद मिळायचा. असं वाटायचं कि बस्स आता कुठलाही विषय द्या, पुस्तक लिहून काढीन. विनोद सोडला तर खरंच लिहिण्यात काहीशी जादूच असते. अजूनही आठवतं, माहेरून येणाऱ्या अंतर्देशीय पत्राची आतुरतेने वाट बघणारी माझी आई. आणि ते वाचताना भान हरवून जायचं तिचं. मध्ये कही वर्षापूर्वी आइला पाठवलेले एक पत्र हाती आलं. मनातील भावना अचुकरीत्या आपल्या माणसापर्यंत पोचवणारे पत्र. ते वाचून मन, शिक्षणासाठी घर सोडताना घाबऱ्या अंतःकारणाने देण्यात आलेल्या निरोपाच्या आठवणीतून प्रवास करून आले. अशा अनेक अनुभवलेल्या, मनाला रुचणाऱ्या गोष्टीचं हे आपला मासिक.

पहिल्या मासिक आवृत्तीची उत्सुकतेने आपण सगळेच वाट बघत होतो. आम्हाला मिळालेल्या प्रतिसादांबद्दल आम्ही खूप आभारी आहोत. मासिकाची थोडक्यात झलक द्यायची झाली तर, ह्या मासिकात ललित लेखन भागात Salt Lake मधील पहिल्या काही वर्षांचा अनुभव सौ. अर्चना ह्यांनी दिलखुलासपणे लिहिलाय. पुढे गुढी-पाडव्यावर सौ. तपस्या ह्यांचा मीहितीपूर्वक लेख आहे. पुढे अमितचे आईला विद्यार्थी-दशेत लिहिलेले, घरापासून दूर राहण्याची खंत दर्शवणारे पत्र. बंड्या बोपर्डीकर हे डोळे पाणवणारे, पात्र रंगवलंय श्रीयुत श्रीवास ह्यांनी. ह्या भागात शेवटी युटास्थित मोनलचे वडील, श्री.

श्रीकांत अग्निहोत्री ह्यांनी मंगेश पाडगांवकर ह्या लाडक्या साहित्यिकाच्या आठवणीखातर लेख सादर केलाय.

आरोग्य भागात, योगासनाचा Utah मध्ये प्रसार करण्यात ज्याने सिँहाचा वाटा उचलला असे श्री. संतोष, त्याचबरोबर आयुर्वेदाचा अभ्यास असणाऱ्या सौ. अंजली ह्यांनी उपयुक्त अशी माहिती असलेला लेख सादर केला आहे. ह्याच भागात प्रितीने निरोगी जीवनशैलीस साजेशी पाककृती सादर केलीये.

पुढे कविमन ह्या भागात, सौ. मेघाने स्त्रीचं मनोगत काव्यात्मक रूपात मांडलाय. सकारात्मक जीवन जगण्याची उर्मी देणाऱ्या आणि अंतर्मुख करणाऱ्या काही सुंदर कविता अभिज्ञा आणि मिलिंद ह्यांनी काव्यरसिकांसाठी सादर केल्यात.

शेवटच्या भागात बालगोपाळांनी पाठवलेली छानशी चित्रे बघायला मिळतील. इशिका ह्या चिमुकलीने लिहिलेला एक लहानसा उतारा आहे. मासिकाची सांगता आकाशने पाठवलेल्या गणिती व ओजस ने बनवलेल्या शाब्दिक कोड्याने होईल.

मासिकाची संकल्पना श्रीयुत श्रीवास अष्टपुत्रे ह्यांच्या पुढाकारातून झाली. आपला प्रतिसाद, प्रोत्साहन आणि उत्साहावरच हे मासिक आपला पुढचा प्रवास करेल. तुमच्या घरातील सगळ्यांना, विनंती आहे कि, तुमचे स्वतःचे मराठी किंवा इंग्लिश लेख, कविता, गोष्टी, चित्रं आमच्यापर्यंत नक्की पोहोचवा.

यु म मं अध्यक्षांचे मनोगत

नमस्कार मंडळी,

मराठी नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.
आपण मकरसंक्रांती च्या कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिलात त्या बद्दल मनःपूर्वक आभार. पहिल्या कार्यक्रमाच्या आठवणी आणि आनंद अजून ओसरला नाहीं तोवर आपलं मराठी नविन वर्ष सुरु झालं. यंदा सुद्धा आपण पाड़वा, गणेशोत्सव, दिवाळी साज़री कारणार आहोत. त्याच बरोबर आम्ही काही नविन उपक्रम घेऊन येत आहोत. थोडक्यात आज पर्यंतचा युटा मराठी मंडळाचा आढावा घेवु या. २००९ साली मराठी मंडळांची बिजे पेरण्यात आली. आज तो वृक्ष चांगला बहरला आहें. या यशस्वी वाटचाली मधे मराठी मंडळा वरील समिती व कार्यकर्ते यांचा मोलाचा वाटा आहे. आज पर्यंत आपण मकरसंक्रांत, पाड़वा, गणेशोत्सव, दिवाळी यांसारखे सण साजरे केले, अवघ्या महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आपण साज़री करतों. मंडळाच्या काही कार्यकर्त्यांनी मिळून स्वराज्य ढोल पथकाची स्थापना केली. मराठी सिनेमा व मराठी कलाकारांचे कार्यक्रम सादर करण्यात आले. खरोखरच आज पर्यंत च्या सर्व समिति सदस्य आणि कार्यकर्त्यांमुळे मंडळाने अतीशय यशस्वी वाटचाल केली आहें. या सर्वांचे मनापासून अभिनंदन आणि आभार!!! आज आपण इथे मायदेशा पासून दूर कर्मभूमित राहतो. धकाधकीचं जीवन, वाढते तंत्रज्ञान या मधून आपले छंद, आरोग्य या आणि अशा गोष्टी कड़े आपलं थोडं दुर्लक्ष होत आहे. आजपर्यन्त आपण मराठी मंडळा मध्ये एकत्र येऊन मराठी सण साजरे करत आलों आहोत, सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेत आलों आहोत. यंदाच्या वर्षी आम्ही एक पाऊल पुढे घेऊन मराठी नविन वर्षा चे औचित्य साधून मंडळाच्या माध्यमातून आपले छंद, आपले आरोग्य जतन करण्यासाठी काही नवीन उपक्रम सुरु करीत आहोत. योग अभ्यास, मराठी पुस्तकांच वाचनालय, त्रैमासिक आणि मराठी शाळा यांचा या उपक्रमात समावेश कारणार आहोत.
वाचनालय- जवळ-जवळ १०० दर्ज़ेदार मराठी पुस्तकं आम्ही आपणा साठी उपलब्ध करत आहोत.

त्रैमासिक- आपण लिहिलेले लेख, कविता, पाककृति, आपण आणि मुलांनी काढलेली चित्र, हस्याचित्र, विनोद, पौराणिक कथा, कोड़ी इत्यादी चा यामध्ये समावेश कारणार आहोत.

मराठी शाळा- आपल्या बाळगोपाळांना आपल्या संस्कृती ची महिती, आपली मायबोली शिकविणे या उद्देश्याने मराठी शाळा सुरु करीत आहोत.

मग चला तर मंडळी, आपण सगळे मिळून मराठी संस्कृति, आपले छंद, आरोग्य, शाळा या उपक्रमांत सहभागी होऊयात. आपला मंडळाच्या कार्यक्रमात आणि या उपक्रमांत सहभाग आणि भरघोस प्रतिसाद असेलच!!! आपला मराठी मंडळा वरचा विश्वास आणि लोभ असाच राहों. धन्यवाद.

आपली विश्वासु,

अर्चना यादव
युटा मराठी मंडळ २०१८-१९

शीर्षक आणि मुखपृष्ठ - माहिती

"आरंभ"

कुठलेही चांगले कार्य यशस्वी होण्यासाठी जसे चांगले विचार, ध्येय, जिद्द आणि अपार कष्ट करण्याची तयारी या गोष्टींची आवश्यकता असते त्याच प्रमाणे त्या संपूर्ण प्रवासात एक अत्यंत महत्वाचा क्षण म्हणजे जेंव्हा ते कार्य करण्याची इच्छा आपल्या मनात उत्पन्न होते आणि त्या दृष्टीने आपण पहिले पाऊल टाकतो. त्याच क्षणी एका यशस्वी कार्याचा आरंभ झालेला असतो.

पहिल्या मासिकाचे प्रकाशन करून आपण या प्रवासातील प्रथम पाऊल टाकतोय. आपल्याला कला प्रदर्शनाची संधी देणारा त्याचप्रमाणे ज्ञान आणि वैचारिक देवाणघेवाणीचा हा प्रवास आपल्या सर्वांना अतिशय आनंदाचा जावो.

युटा मराठी मंडळाच्या त्रैमासिकाला अत्यंत मार्मिक असं शीर्षक सुचवलंय सौ भवाळकर यांनी.

मुखपृष्ठ:

मासिकाच्या शीर्षकाला अनुसरून तसेच युटाच्या परिसराचे चित्रण करणारे पण त्याच बरोबर आपल्याला मराठी पणाची आठवण करून देणारे असे अतिशय सुंदर मुखपृष्ठ तयार केले आहे श्री हेमंत गोरे यांनी.

युटाची ओळख असणारे बर्फाच्छादित डोंगर, डोंगरमाथ्यावर फडकणारा भगवा ध्वज आणि नुकताच उदयास आलेला सूर्य यातून युटा मराठी मंडळाच्या 'आरंभ' या त्रैमासिकाची ओळख अगदी सहजरित्या आपल्याला होते.

ललितलेखन: युटा, मराठी आणि मंडळ - अर्चना यादव

साधारण २००५, नोव्हेंबर चा महिना, आमचा अमेरिके माधिल युटा नामक राज्यांत अमच्या यांचा नोकरीनिमित्त जाण्याचा निर्णय झाला. कॅलिफोर्निया, न्यूयॉर्क बद्दल ऐकून होते पण युटा बद्दल उभ्या आयुष्यात पहिल्यांदाच ऐकले. विजय (आमचे हे) याची डिसेंबर मध्ये ऑफ़िस आणि इतर औपचारिकता पार पाडण्याकरिता एक फेरी झाली. भरीस आजून काही गोष्टी कळाल्या, तिथे ४/५ महीने हिमवर्षाव आणि कडाक्याची थंडी असतो. आम्ही युटा काऊंटी मध्ये वास्तव करणार होतो. विजय ने सांगितले की तिकड़े 'देसी' अगदी बोटावर मोजण्याइतकेच आहेत. आणि मराठी कुटुंब तर नाहीतच. मग पारंपरिक पोशाख आणि दगिने कशाला घ्या, उगाच ओझे.

अशा प्रकारे नवीन नवीन गोष्टी, नवीन अनुभव, नवीन आव्हान स्वीकारण्याचा निर्णय घेऊन आमच्या प्रवासाची तयारी सुरू झाली. जानेवारी ३०, २००६ ला आम्ही युटा ला पोहोचलो. अर्थातच आमचे स्वागत पांढऱ्या शुभ्र बर्फाने आणि गोठविणाऱ्या ठंडीने झाले. आजवर हिंदी सिनमा मध्ये पहिलेला बर्फ़, हिमवर्षाव प्रत्यक्षात पहिल्यांदाच अनुभवला, तो आनंद अविस्मरणीय, शब्दांत वर्णन करण्यापलीकडे आहे.

नवनव्या गोष्टीं चा अनुभव घेत, शिकत, धड़पड़त आम्ही अमेरिकन-भारतीय अशा संमिश्र संस्कृतींत रूळु लागलो. जी आव्हानं स्वीकारून इकडे आले ते आता कठीण वाटायला लागले. आधी कळल्याप्रमाणे खरंच इथे देसी कमी होते. आता Walmart, Costco मध्ये देसी चेहरे दिसले कि आनंद व्हायचा, ओळख करून घेण्याची धडपड होऊ लागली. काही कुटुंबा बरोबर ओळख झाली. भेटीगाठी, गेट टुगेदर होऊ लागली. विविधते मध्ये एकता जाणवू लागली, वाढू लागली.

पण या सगळ्या प्रवासात मराठी भाषेची, मराठी पदार्थांची उणीव भासू लागली. मुलांना थोडेफार मराठी बोलतां येत होते पण इतर कुटुंबां समवेत इंग्रजी माध्यमातून बोलणे होऊ लागले. संमिश्र संस्कृती मुळे मराठी भाषा, मराठी गाणे, वर्तमान पत्र, मराठी पदार्थ मागे पडू लागले. इंटर्नेट च्या माध्यमातून मराठी वर्तमान पत्र वाचणं, मराठी गाणी ऐकणं चालू झालं. हळूहळू यूटा मध्ये भारतीयांची, मराठी भाषिकांची संख्या वाढू लागली. २००९ मध्ये मराठी मंडळाची स्थापना झाली. मंडळात येणे जाणे सुरू झाले. सवडीने २०१४ साली मंडळां च्या समिती मध्ये सहभागी झाले. मग काय अचानक खूप ओळखी वाढल्या. सुरूवातीला जी काळजी होती, मुलांना आपली संस्कृती कळेल का? आपली भाषा येईल का? आता ही काळजी मिटायला लागली. मुलांना आमच्या व्यतिरिक्त मराठी बोलणारे काका, मावशी, आजी-आजोबा मराठी मंडळात भेटू लागले. नवीन कुटुंब मंडळात आले कि, तू पुण्याची कि मुंबईची अशी चौकशी होऊ लागली. मग आम्ही मुबंईकर कसे वेगवान, पुणेकर कसे निवांत, पुणेरी पाट्यां यांवर गप्पा रंगू लागल्या, माहेर कडची माणसे भेटू लागली. ५-६ वर्षापूर्वी इंटर्नेट रेडीओ वरील "अब सुनते है लेटन युटा से श्री विनायक आपटेजी की पसंद" हे अनेक वेळा ऐकलेले आपटे काका आता मंडळात भेटू लागले.

मंडळात मकरसंक्रांतीचं हळदी- कुंकू, पाड़वा, गणपती, दिवाळी जोरात साज़री होऊ लागली. वोर्ड्रोबमाधिल साड्यांची संख्या वाढू लागली. काळया साडया, पैठणी, नऊवारी दिमाखात मिरवू लागल्या. घरोंघरी हळदी-कुंकू साठी ची आमंत्रणं येऊ लागली, इतकी की तुझ्या घरी कधी, माझ्या घरी कधी अशी तरखांची मारामारी सुरु झाली ती सुद्धा २-३ महिन्यांपूर्वी पासुनच. 'हॅरी- कुकू' म्हणणारी माझी मुलगी आता व्यवस्थित हळदी-कुंकू म्हणते. मुले आता लाडक्या बाप्पांची वाट पाहतात. घराघरात बाप्पांच जोरात

स्वागत होते. आरती, प्रसादासाठी आमंत्रणं येतात. मोदक, पुरणपोळी, वडापाव, मिसळ अशा अनेक पारंपारिक महाराष्ट्रीय पदार्थांचा आनंद घेतां येऊ लागला. मुले सांस्कृतिक कार्यक्रमा मध्ये, ढोल-लेझीम मध्ये सहभागी होऊ लागली.

अश्याप्रकारे आमचं युटा मधील वास्तव्य मराठी मंडळामुळे, मराठी मित्र परिवार तसेत आमच्या परप्रांतीय मित्रांमुळे सुसह्य झाले आहे. इथे आपल्या सगळ्यांचा मिळून एक मोठा परिवार निर्माण झाला आहे. A home away from home!!!

ललितलेखन: मराठी नुतन वर्ष: 'गुढीपाडवा' - सौ. तपस्या तपन भार्गवे

आला वसंत ऋतू आला,
वसुंधरेला हसवायाला,
सजवीत नटवीत लावण्याला.....
आला वसंत ऋतू आला.
रसरंगाची करीत उधळण,
मधुगंधाची करीत शिंपण,
चैतन्याच्या गुंफित माळा रसिकराज पातला.....
आला वसंत ऋतू आला.
वृक्षलतांचे देह बहरले,
फुलाफुलांतुन अमृत भरले,
वनावनांतून गाऊ लागल्या पंचमात कोकीळा.....
आला वसंत ऋतू आला.

'सुभद्राहरण' चित्रपटातील शांताराम आठवले यांचे हे गीत ऐकल्यावर जणू सृष्टीचा पुनर्जन्म झाला की काय असेच वाटते. आता तुम्ही म्हणाल या सर्वाचा नवीन वर्षाशी आणि गुढीपाडव्याशी काय संबंध? पण खरे पाहता खूप गहन संबंध आहे वसंत ऋतूचा आपल्या नवीन वर्षाशी.

नवीन वर्ष "New Year" म्हणून हल्ली केवळ १ जानेवारी हाच दिवस जगप्रख्यात आहे. कारण आजच्या या करमणुकीच्या स्पर्धात्मक जगात सण-उत्सवांचं महत्व हे केवळ धमाल आणि मज्जा करणे याच भावार्थात हरवून गेलं आहे. त्यातील सांस्कृतिक, नैसर्गिक, धार्मिक आणि आध्यात्मिकशास्त्र लुप्त झालं आहे. मराठी दिनदर्शिकेतील पहिला महिना 'चैत्र'. वर्षारंभाचा प्रारंभदिवस 'चैत्र शुद्ध प्रतिपदा' म्हणजेच 'गुढीपाडवा'. आजकाल आपण साजरा करीत असलेला १ जानेवारी हा खरंच वर्षारंभ आहे का? याला काही शास्त्रीय आधार आहे की नाही याची काही कल्पना नाही; परंतू चैत्र शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभ करण्यास अर्थात गुढीपाडवा साजरा करण्यास नक्कीच नैसर्गिक, ऐतिहासिक, धार्मिक, वैज्ञानिक आणि अध्यात्मिक कारणे व महत्व आहे. खरं तर सर्वच सणांमागे एक अध्यात्मशास्त्रीय आधार असल्याने ते साजरे करताना त्यांतून चैतन्यनिर्मिती होते व त्यायोगे अगदी सर्वसामान्य मनुष्यालाही ईश्वराशी तादात्म्य पावण्यास सहाय्य होते.

"सर्व ऋतूंत 'कुसुमाकरी वसंत ऋतू' ही माझी विभूती आहे" असे भगवद्गीतेत भगवंतांनी म्हटले आहे. शिशीर ऋतूत झाडांची पाने गळून गेलेली असतात व वसंतात तीच झाडे नव्याने मोहोरतात, वृक्षवल्ली टवटवीत होतात. पाडव्याच्याच सुमारास झाडांना नवीन पालवी फुटते. जगभर हवामान समशितोष्ण व वातावरण उत्साहवर्धक असते. पक्षी देखील नवीन पालवी पाहून दिवसभर मंजुळ गाणी गात असतात. एकंदर सारी सृष्टी जणू नव्याने जन्म घेतल्याप्रमाणे दिसू लागते. जगभर नवचैतन्यात संपूर्ण सजीव सृष्टी न्हाऊन निघते. हेच आहे गुढीपाडव्याला नवीन वर्षारंभ मानण्यामागील नैसर्गिक महत्व.

भगवान श्रीविष्णूंनी रामाच्या अवतारात दुष्ट प्रवृत्तींच्या राक्षसाला (रावणाला) ठार मारले. त्यानंतर प्रभू रामचंदानी चैत्र शुल्क प्रतिपदेच्या दिवशी अयोध्येत प्रवेश केला. त्यावेळी जनतेने गुढ्या

तोरणे-पताका उभारून त्यांचे स्वागत केले. तेव्हापासून दर चैत्र शुक्ल प्रतिपदेला गुढ्या तोरणे उभारून आनंदाचा विजयोत्सव दिन साजरा होऊ लागला. हे झाले ऐतिहासिक कारण.

आता पाहूया अध्यात्मिक महत्व. गुढीपाडव्याला सुरु होणारे नवीन वर्षाचे कालचक्र हे विश्वाच्या उत्पत्तीकाळाशी निगडीत असल्याने सृष्टी नवचेतनेने भारित झालेली असते, याउलट ३१ डिसेंबरला रात्री १२ वाजता सुरु होणारे नवीन वर्षाचे कालचक्र हे विश्वाच्या लयकाळाशी निगडीत असते. निसर्गनियमाला अनुसरुन केलेल्या गोष्टी मानवाला पूरक असतात. तर विरुद्ध केलेल्या गोष्टी मानवाला हानीकारक असतात. गुढीपाडवा हा सुर्योदयानंतर साजरा केला जातो, व सुर्यास्ताआधी गुढी उतरविण्याची प्रथा आहे; याअर्थी ३१ डिसेंबरला रात्री १२ नंतर सुरु होणा-या नववर्षाची तुलना तमोगुणी रात्रीशी करता येईल. ही परधर्मियांवर किंवा परसंस्कृतीवर केलेली टिका नव्हे तर केवळ आपल्या सनातन धर्माच्या शाश्वत चिरंतन तत्वाचा केलेला उहापोह आहे. याचा खरं तर आपल्याला अभिमानच वाटावा, कारण हिंदू धर्मात जे काही सणोत्सव येतात त्यामागे एक तात्विक कारण दडलेले असते.

गुढीपाडवा हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. इतर दिवशी शुभकार्यासाठी ब्राह्मणाकडून खास मुहूर्त काढला जातो परंतू हा दिवस एवढा शुभ मानला जातो की मुहूर्त न काढता ह्या दिवशी कोणतेही शुभकार्य केले जाते.

ह्या दिवशी प्रात:काळी लवकर उठून घराची व परिसराची स्वच्छता करावी. अंगास सुवासिक तेल व उट्णे लावून अभ्यंगस्नान करावे. सर्वांनी नवीन वस्त्रे परिधान करावी. विशेषकरुन स्त्रीयांनी या दिवशी पारंपारिक, वस्त्राभुषणे परिधान करुन अंगणात पाटाभोवती सुबक-सुंदर रांगोळी रेखावी. सर्वप्रथम गणेशाचे पूजन करुन कुलदेवतेचे, इष्ट्देवतेचे पूजन करावे. घराच्या दरवाजाला आंब्याच्या पानांचे तोरण बांधावे. वेळूची (बांबूची) काठी घेऊन ती स्वच्छ धुवून तिच्या टोकाला तांबडे वस्त्र, फुलांची माळ, साखरपाकाची माळ घालून त्यावर एक धातुचा (तांब्याचा असल्यास अतिउत्तम) तांब्या उपडी ठेवावा. अशारितीने तयार केलेली गुढी, दारासमोर घातलेल्या रांगोळीवर एक पाट मांडून किंवा चौरंग मांडून त्यावर उभी करावी. सुर्योदयानंतर लगेचच गुढी उभारावी. अशा प्रकारे गुढीची पुजा करुन कडूलिंबाची कोवळी पाने घेऊन त्यात धने, जिरे, मिरी, हिंग, सैंधव मीठ व ओवा इत्यादी घालून ते मिश्रण चांगले वाटून त्याचा प्रसाद करावा व तो नैंवेद्य गुढीला दाखऊन घरातील सर्वांनी प्राशन करावा. हे मिश्रण आयुर्वेदिय गुणसंपन्न असल्यामुळे याच्या सेवनाने शरीरातील त्रिदोष संतुलित राहण्यास मदत होते. तसेच कडूलिंबाची पाने ही त्वचाव्याधीमुक्तीसाठी खुप गुणकारी असतात. अमेरिकेच्या नॅशनल सायन्स अकादमीने 'नीम: ए ट्री फॉर सॉल्विंग ग्लोबल प्रॉब्लेम्स' नावाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे.

निम्बस्तिक्त: कटू: पाकेलघु: शीतोह्यग्नि-वात-कृत।

ग्राही ह्रद्यो जयेत् पित्त-कफ-मेह-ज्वर-कृतीन्।।

कुष्ठ-कासारूपी हल्लास-श्ववथु-व्रणात्।

(भूक न लागणे, उलट्या होणे, आम्लपित्त, कावीळ, मूळव्याध, पोटदुखी, पोटात जंत होणे, डोक्यात उवा होणे, वेगवेगळ्या प्रकारचे त्वचारोग, व्रण, जखमा, दाहरोग, विंचूदंश, सर्पदंश, अकाली केस पांढरे होणे, वेगवेगळ्या प्रकारचे ज्वर (ताप) मुखरोग, दातांचे आजार, नेत्रदोष, स्त्रियांचे आजार, सांधेदुखी इत्यादी

आजारांवर कडूलिंब उपयुक्त आहे. जंतुनाशक म्हणूनही कडूनिंब उपयुक्त आहे. त्यामुळे हा प्रसाद प्राशन करण्यामागीलही एक आयुर्वेदीय शास्त्रं आहे.)

यादिवशी श्रीखंडपुरीचा खास गोड नैवेद्यही दाखविला जातो व सहकुटूंबे आनंदे मिष्ठांन्न भोजन केले जाते. सायंकाळी सुर्यास्ताआधी ही गुढी शास्त्रोक्त पद्धतीने उतरविली जाते. कोणताही सण असो; भक्तीभावाने घरात आनंदी वातावरण ठेऊन साजरा केल्याने जे समाधान लाभते ते अद्‌वितीय असते. या दिवशी चांगल्या कामाचा शुभारंभ करावा.

गुढीपाडव्यापासून, नवीन शालिवाहन शकवर्षारंभापासून नवीन पंचांगाची सुरुवात होते. “पंचांग म्हणजे आकाशाचे वेळापत्रक!” वर्षभरातील खगोलीय घटनांचे वेळापत्रक पंचांगात असते.

ही झाली केवळ पुजाविधी. परंतू गुढीचे सुक्ष्म स्तरावरील खरे अध्यात्मिक महत्व वाखाणण्यासारखे आहे. कदाचित काही माणसांना हे पटणारही नाही, परंतू जे सुक्ष्म पातळीवर घडत असते ते म्हणजे; या दिवशी गुढीतील प्रत्येक पदार्थात ब्रह्मांडातील एक अलौकिक शक्ती विद्‌यमान होते. गुढीचा कलश हा सुर्याच्या दिशेने उंच उभारावा जेणेकरुन सुर्याकडून प्रजापती लहरी तसेच आनंद व चैतन्य लहरी कलशात आकृष्ट व्हाव्यात. ब्रह्मदेवाकडून ह्या दिवशी सत्वगुण, चैतन्य, ज्ञानलहरी आणि सगुण-निर्गुण ब्रह्मतत्व यांचे प्रक्षेपण गुढीत तसेच गुढीला लावलेल्या फुलांच्या व साखरेच्या माळा, आंब्याची पाने, भरजरीत वस्त्रं यांमध्येही होते. गुढीला ब्रह्मध्वज असेही म्हणतात. या वस्तूपैकी ग्रहण करण्याजोग्या वस्तू ग्रहण केल्यास वा वास्तूत ठेवल्यास त्यातील ब्रह्मतत्वाचा लाभ घरातील व्यक्तींस होतो. परंतू प्रत्येक जीवांत परमेश्वराप्रती व या सणांप्रती ज्याप्रमाणात श्रद्धाभाव, तेवढया कमी-अधिक प्रमाणात या लहरींचा लाभ होतो.

प्रत्येक हिंदू सणामागे अशाच प्रकारचं अध्यात्मशास्त्र दडलेलं आहे. तेव्हा प्रत्येक सण साजरा करण्यामागील उद्देश व हेतू जाणून घेऊन जर सण साजरे केले गेले तर संपूर्ण मानवजातीचे ‘कल्याणच कल्याण होईल” यात काही शंकाच नाही.

ब्रह्मादेवाने हे जग चैत्र शुल्क प्रतिपदेच्या दिवशी निर्माण केले असे पुराणात सांगितलेले आहे. **त्यामुळे विश्वाचा वाढदिवस म्हणजेच “गुढिपाडवा”.**

ललितलेखन: आईस पत्र - अमित श्रीगोंदेकर

प्रिय आईस,

आज जवळपास 90 ते 99 वर्षांनी पत्र लिहतोय. काही कळत नाहीये. मन दादून आलय. डोळ्यातुन सारखं पाणी का येतंय? फक्त तुला पत्र लिहतोय हया कल्पनेनेच एवढा का मी रडतोय? मला ह्याचं काहीच मरण कळत नाहिये. असो.

आज म्हणता म्हणता आठ वर्षे झाली, प्रत्येक वेळी जेव्हा वाटलं, आता आपण घर सोडून राहू शकतो. तेव्हा माझा चांगलाच फिरनोड झाला. अजून सुध्दा बऱ्याच मनातल्या गप्पा "मी घरी असताना" अशा सुरू होतात. किंवा "आता जेव्हा घरी जाईल" अशा असतात.

एवढं सगळं बोलताना मी सगळ्यं मुख्य कारणंच विसरलो. "वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा" आई !! तुझा वाढदिवस साजरा झालेला मला कधी आठवतंच नाहिये. पण मला तुला ह्या पत्राशिवाय दुसरी दुसरी मोठी भेट असेन, असं वाटलं नाही. केवढी मोठी झाली आलू, तु, पुढं वर्षं, तुला म्हातारी इगलेल Imagine च होत नाहिये. तरी सुध्दा अजुन खुपखुप सुंदर आहेस.

आई तुझी खुप आठवण येते बघ. तु माझ्यासाठी केलेल्या सर्व छोट्या छोट्या गोष्टी मला अजून तंतोतंत लक्षात आहेत. मोठ्या गटात असताना डब्यातल्या बटरच्याची भाजीपासुन ते दवलेली पुऱ्याला जाताना केलेल्या बनकाळेच्या पोहयापर्यंत, सर्व क्षण मनात कोरले गेलेत. मी डोळे चोळत कधीतरी उठतोय, तर पहाटे उठून तुझा स्वयंपाक तयार असायचा. मग मस्तु गप्पा मारत चहा. त्यानंतर तुझा नको नको त्या सर्व गोष्टी बरोबर देव असा आग्रह. मग स्टेशन कडे जाताना खुटी काढायची गडबड, मग मगदी ट्रेन जाईपर्यंत आणि मी

दिसेनासा होईपर्यंत, मला टाटा करणारी आई नेहमी डोळ्यात पाणी आणते.

त्यानंतर सला ताप आल्यावर (Mar 2008) मध्ये पुण्याला माझ्याकडे येऊन राहिलेलीस. त्या विचित्र तापामध्ये (दर ३ तासांनी प्रचंड थंडी वाजून देणारा), तू खूप मदत केलीस. सातवीच्या इंग्रजीच्या परिक्षेत माझ्याकडून ज्ञान घेतलेला अध्याय आणि त्यासाठी रोज सकाळी सला ला उठवून चहा सोबत केलेला अभ्यास खूपच स्मरणात आहे. अजून सुद्धा तू मला "Video Game" नाही घेऊन दिलास पण, म्हणे ७-३० पर्यंत पाहे झाले की घेईन जाचणी मध्ये. (म्हणा आता विसरलोस ते पाहे)

सगळ्यात भारी गमंत म्हणजे, मी शाळेतून आल्यावर तू स्वयंपाक करत असताना पाठीच्या पिशवीवर हात ठेवून ज्या गप्पा मारायचो तेव्हा नकळतच तू केलेल्या स्वयंपाकाच्या पद्धती लक्षात राहिल्या, आणि आज मी जेव्हा काही विसरते स्वयंपाक करताना तेव्हा त्या मनातल्या "Video" ला पुढे मागे करून सगळ पुन्हा आठवते.

आई तुझ्याकडून मी "Sincerity & Hard work" काय असतं ना ते खरच शिकले. एक काम झालं की दुसरं, तुला कधी रिकामं Timepass करताना बघितलंच नाही, except तुझ्या आवडत्या टिव्ही सिरियल्स. हा हा.

आजपर्यंत उपवास, जो मी शंभरदा केले एकदे एकदे, पण दरवेळी ते fail होतात, त्याला तुझ्या उपवासची चव कधीच नाही आली. एकाना आजुनतरी कुठेच नाही बघितली अशी चव.

असो. अशा प्रकारे आज finally मी पत्र लिहिलंस "जिंकलो बाबा एकदाचं"! पत्रात चुका असतील, तर माफी मागतो. तुझ्यासारखं मोठं अंतर नाहीये मुळे.

"आई तुला पुढचा एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, अशीच Comedy & funny & रहा."

ललितलेखन: व्यक्तिचित्र: बंड्या बोपर्डीकर - श्रीवास अष्टपुत्रे

आज बऱ्याच वर्षांनी गावाकडे पाडव्यासाठी म्हणून आम्ही सगळे जमलो. सालाबादप्रमाणे गुढी उभारून पूजा वैगेरे आटोपल्यावर माजघरात गप्पा रंगल्या. साहजिकच लहानपणीच्या आठवणी निघाल्या आणि बंड्या ची आठवण झाली. बंड्या बोपर्डीकर, लहानपणीच्या आठवणीतलं लक्षात राहिलेलं एक व्यक्तिमत्व. आता बंड्याला व्यक्तिमत्व म्हणण्या इतका भारदस्तपणा त्याच्या मधे नव्हता किंवा त्याचं तेवढं कर्तृत्वही नव्हतं पण काही माणसं उगाचंच आपल्या आठवणीत राहतात त्यापैकी एक बंड्या बोपर्डीकर. कुठलाही सण आला कि बंड्या मनात डोकावून जातो, याचं कारण म्हणजे प्रत्येक सणांच्या दिवशी अगदी तसाच तो डोकावायचा; आमच्या पेठेत राहणाऱ्या प्रत्येकाच्या घरात. याचा कधी कुणाला राग आला नाही; उलटं एखाद्या सणाला बंड्या आला नाही तर आमची आजी आवर्जून विचारायची “अरे ते बंडोपंत आले नाहीत आज?” मग आम्ही पोरं त्याला शोधायला बाहेर पळत असू.

आमचं गाव तसं बऱ्यापैकी मोठं होतं. चार पाच पेठा, दोन तीन आळ्या आणि तीन चार वाड्या होत्या गावात. दहा एक हजारांची वस्ती असेल तेव्हा. गावाच्या मध्यभागातून कृष्णा नदी वाहते, नदीकाठावर पुरातन अशी बरीच मंदिरं आहेत. आमची पेठ गावाच्या एका बाजूला होती, पेठेत खूप जुने वाडे होते. प्रत्येक वाड्यातुन एखादं चिंचेचं, नारळाचं झाड दिसायचं, झेंडू, गुलाब, सदाफुली तर प्रत्येक वाड्याच्या परसात असायचीच. आमच्या वाड्याच्या बाहेर रस्त्याच्या वळणावर एक मोठं बकुळीचं झाड होतं. येणाऱ्या नवीन पाहुण्यांना घराची तीच खूण होती. उन्हाळ्याच्या सुरुवातीला त्याच्या फुलांचा सडा आमच्या दारात पडलेला असायचा. शाळांना सुट्या लागल्या की पेठेतली आम्ही समवयस्क पोरं त्या झाडाच्या बुंध्याला स्टंपा आखून क्रिकेट खेळायचो, बंड्या तेव्हापासून मला आठवतो. आमच्या क्रिकेट मॅच मध्ये अम्पायरिंग चं काम बंड्या आवडीने करायचा, कदाचित त्याला क्रिकेट खेळता येत नसावं पण लहान पोरांवर हुकूम गाजवायची हि एक संधी म्हणून तो हे काम करत असावा. अरे हो सांगायचं राहिलं, बंड्या तेव्हा तिशीत होता. लग्न झालं होत त्याचं पण आम्ही सगळी लहान पोरं त्याला "अय बंड्या चल क्रिकेट खेळायला" अशा हाका मारून बोलवायचो. तो हि "तुम्ही व्हा पुढं मी आलोच चहा घेऊन" असं सांगून नक्की यायचा. सडपातळ बांधा त्याच्या सरासरीपेक्षा जास्ती असलेल्या उंचीमुळे अधिकच सडपातळ दिसायचा. मुळात गौर असलेला पण उन्हात तापून तांबूस झालेला त्याचा वर्ण, अंगकाठीला शोभेल असा लंबुळका आणि पुढचे दात बाहेर असल्यामुळे सतत हसरा दिसणारा त्याचा चेहरा, सतत विस्कटलेले केस आणि मळकट कपडे एकंदर त्याच्या व्यक्तिमत्वाला वेगळेपण द्यायचे. त्याच्या सदऱ्याचा खिसा नेहमी फ़ाटलेलाच असायचा, विचारले तर म्हणायचा "खिशात लपवण्याइतके धन अजून मिळायचंय, ते मिळाले की शिवून घेईन, तोपर्यंत खिसा असला काय अन नसला काय". पेठेतल्या सगळ्या वाड्यांमध्ये बोपर्डीकरांच्या दोन खोल्या तेवढ्या वेगळ्या दिसायच्या. रंग नसलेल्या भिंती, जुन्या पत्र्याचं छप्पर, रात्री घरात एकच दिवा लावल्यामुळे असलेला अंधार. भाऊबंदकी मध्ये घराचा तेवढाच भाग बंडोपंतांच्या खाती आल्याचं नंतर कधीतरी आम्हाला समजलं होतं. बाकीचे बोपर्डीकर कधी पाहिल्याचं माझ्या लक्षात नाही, असं ऐकलं होतं की सगळे पुण्या-मुंबई कडे कामानिमित्ताने गेले होते. बरं ते असो, सांगायचा मुद्दा म्हणजे बंड्या ची परिस्थिती तशी हालाखीचीच होती, शाळा अर्धवट सोडल्यामुळे कुठे नोकरी मिळेना. धंदा करावा त्यासाठी भांडवल तर नाहीच आणि धंद्यासाठी लागणारा स्वभाव हि नाही. दर दिवाळीला आणि पाडव्याला बंड्या स्वच्छ धुतलेले आणि उसनवारीवर इस्त्री करून आणलेले कपडे घालून लॉटरी ची टिकेट्स आणि पंचांग विकायचा. माझे वडील दर दिवाळीला त्याच्याकडून ते लॉटरी तिकीट विकत घ्यायचे. तिकीट निवडीसाठी बंड्या नेहमी माझ्या लहान बहिणीला बोलवायचा आणि म्हणायचा "काका तिकीट ताई ला निवडू द्या, तिच्या नशिबात भाग्य आहे म्हणून तुमचं सगळं छान चालू आहे, घरची लक्ष्मी आहे ताई".

आम्हाला तिकीट निवडता न आल्यामुळे तेव्हा बंड्याचा इतका राग यायचा, आईने त्याला द्यायला दिलेल्या दोन लाडवातला एक त्याच्यावरच्या तत्कालीन रागामुळे आम्ही खात असू. इतरवेळी हा माणूस उदरनिर्वाहासाठी काय काम करायचा हे अजूनही कोडंच आहे. त्याची बायको धुणी-भांडी करून संसार चालवायची.

आमचा मित्रच वाटायचा तो पण कधी बंड्या दिवेलागणीला आणि आम्ही नुकतेच शुभंकरोती म्हणून मोठ्यांच्या पाया पडत असताना जर घरी आला तर आमच्या काकांमुळे आम्हाला त्यालाही नमस्कार करावा लागायचा. आशीर्वाद देताना तो नेहमी "मोठे व्हा, श्रीमंत व्हा " असं म्हणायचा आणि प्रत्येक वेळी त्याच्या डोळ्यांच्या कडा ओल्या व्हायच्या, मग "काकू येतो बरं " असं म्हणून तो पटकन बाहेर पडायचा. तो असं का करतो विचारलं तर काका म्हणायचे "अरे त्याला बरं वाटतं तुम्ही पोरांनी नमस्कार केलात की, आपुलकी वाटते, दुसरं कोण आहे त्याला?" त्याला खरंच आपलं वाटेल असं दुसरं कोणीच नव्हतं, आमच्या पेठेबाहेर त्याला कोणी ओळखत होतं कि नाही याचीही शंका आहे. याची कदाचित त्यालाही जाणीव असेल आणि म्हणूनच होती तेवढी नाती त्याने अगदी घट्ट धरून ठेवली होती. शेजार पाजाऱ्यांच्या प्रत्येक आनंदात आणि दुःखात तो नेहमी हजर असायचा. बरं त्याला कधी आवर्जून बोलावणं नसायचं किंवा कधी तसा मानही मिळाला नसेल पण ह्याला आमंत्रणाची कधी गरजच वाटली नाही आणि कुणी मान द्यावा ह्या अपेक्षांचं ओझं विनाकारण बाळगावं असं कधी त्याच्या ध्यानीही आलं नसेल. पेठेत कुणाकडे लग्न किंवा मुंज असेल तर त्याच्या पत्रिका वाटायचं काम बंडोपंतांकडेच असायचं. स्वच्छ कपडे, डोक्यावर गांधी टोपी आणि कपाळाला गंध लावून तो दारात दिसला म्हणजे आम्ही समजायचो कि कुणाच्यातरी घरचे आमंत्रण द्यायला तो आला असेल. मग "काका, देशपांड्यांकडच्या लग्नाची पत्रिका घेऊन आलोय" असं तो दारातूनच ओरडायचा. "आज फार घाई आहे बरं" असं म्हणून चांगला वीस पंचवीस मिनिटं प्रत्येक घरात घालवायचा. "देशपांड्यांच्या कवितेनं नशीब काढलं, पुण्याला दिलीये तिला, नवरा कुठल्याश्या कंपनीत इंजिनीअर आहे, तीन चार वेळा परदेशी सुद्धा जाऊन आला आहे म्हणे, स्वतःच घर आहे पुण्यात, घरची मंडळी हि चांगली आहेत स्वभावानं, सासरे सरकारी नोकरीत आहेत, सासू शिक्षिका आहे हुजुरपागेत, अन मुलाच्या बहिणीचं लग्न झालंय, अजून काय हवं?" अशी मुलीच्या होणाऱ्या सासरची माहिती पुरवल्यावर "कवितेच्या मानानं चांगलंच म्हणायचं हे स्थळं" असं उगाचंच एखादं वाक्य फेकायचा. मग चहा बशीत ओतून भुरके मारत प्यायचा आणि पुढच्या घरी पळायचा.

या माणसाच्या आयुष्यात कोणतीच अडचण नव्हती का? हा इतका निश्चिन्त कसा असतो याचं आम्हाला नेहमी कोडं पडे. पण महिन्यातून एक दोनदा, संसाराचा भार अनावर झाला आणि नवऱ्याचा निष्काळजीपणा असह्य झाल्यावर त्याची बायको बंड्याचा यथेच्य पाणउतारा करायची. मग सगळ्या पेठेला बोपर्डीकरांच्या मागच्या बऱ्याच पिढ्यांच्या एकंदर कर्तृत्वाची आणि इतिहासाची पुनःश्च ओळख व्हायची. पण या सर्व प्रकारात बंड्या त्याच्या बायकोला कधीच उलटून किंवा रागावून बोललेला मला आठवत नाही. त्यानंतर बराचवेळ तो पायरीवर बसलेला असायचा. गल्लीतली काही टवाळ पोरं मग त्याला "काय रे बंड्या, बायको ओरडत होती व्हय रे?" म्हणून डिवचायची. त्यालाही तो निर्विकारपणे खांदे उडवून "चालायचंच" असं उत्तर द्यायचा. पण त्याच्या डोळ्यात त्यावेळी दुःखाची छटा आणि असहाय पणाचे भाव नक्की जाणवायचे, अशावेळी आम्हा मुलांना त्याच्याशी बोलावसं वाटायचं नाही.

काही वर्षांनी शिक्षणासाठी म्हणून आम्ही पुण्याला आलो आणि गावाकडे जाणं कमी होऊ लागलं. अधूनमधून पेठेतलं कोणी भेटायचं आणि तिथल्या सगळ्या वार्ता कळायच्या. अर्थात कधीतरी सणासुदीला

गावाला चक्कर व्हायचीच पण मग दिवस त्यातच निघून जायचे आणि परत पुण्याला जायची वेळ यायची. एकदा असाच मी गावाला जाण्यासाठी स्वारगेट वर एसटीची वाट बघत उभा होतो. मागून अचानक पाठीवर थाप पडली, बंडोपंत उभे होते. एसटी ला उशीर असल्यामुळे मग आम्ही चहा घ्यायला कॅन्टीन मध्ये गेलो. गप्पा चालू झाल्या. मी म्हणालो "काय बंडोपंत कसं काय म्हणतंय गावं, क्रिकेट चालू आहे कि नाही अजून" त्यावर तो म्हणाला "रस्ता रुंदीकरणात आपलं बकुळीचं झाड तोडलं, आता रस्त्याला दुतर्फा गाड्या उभ्या असतात आणि हल्ली पोरांना बाहेर खेळण्यापेक्षा टीव्ही बघण्यात जास्ती रस आहे, कसलं क्रिकेट अन कसलं काय. तुमच्या सारखे मित्र नाही उरले आता तिकडे" एकंदर त्याच्या बोलण्यात पूर्वीचा उत्साह नव्हता, त्याच्या हसऱ्या चेहऱ्यावर कुठेतरी काळजी जाणवू लागली होती. कपाळावर आठ्यांची संख्या वाढली होती आणि पिकलेले केस एकंदरच त्याच्या वयाची जाणीव करून देत होते. बोलता बोलता मग त्याच्या बायकोचा विषय निघाला. "खूप आजारी असते रे ती हल्ली" डोळ्यात आलेलं पाणी लपवायचा अतोनात प्रयत्न करीत तो म्हणाला. "माझ्याकडे जेवढं होतं ते सगळं दिलं मी तिला" बंड्याच्या ह्या वाक्यांनी जरा दचकलोच मी, पण मग कुच्छित हसत तो म्हणाला "कष्ट आणि गरिबी" तो सांगत होता, म्हणाला "मी तिला कधीच वटसावित्रीचं व्रत करू दिलं नाही, कसंय, देवाला कधी जाग येईल याचा नेम नाही मी आयुष्यभर रोज पूजा केली पण त्यानं ऐकलं नाही अन बरोबर हिच्या व्रताला प्रसन्न व्हायचा तो. बरं देवाचं काय जातंय पण पुढचे सात जन्म कष्टात जातील तिचे". यानंतर पूर्ण प्रवासात आम्ही काही बोललो नाही, तो खिडकीतून एक टक बाहेर बघत बसून होता.

आता बंडोपंत खूप थकलेत असं काकांकडून कळलं. त्याला भेटून यावं असं वाटलं. त्याच घर अजूनही तसंच होतं. आत अंधाऱ्या खोलीत हा भिंतीला टेकून बसला होता. बऱ्याच वर्षांनी पाहिल्या मुळे खूप म्हातारा वाटत होता तो. मी आलोय असं सांगितल्यावर "काय म्हणतंय काम? किती दिवस मुक्काम" अशी चौकशी त्याने केली. दहा पंधरा मिनिटे गप्पा मारल्यावर मी जाण्यासाठी उठलो. निरोप घेताना तो म्हणाला "येत जा रे वरचेवर, बरं वाटतं आपली माणसं भेटली की. पुढच्या वेळी याल तेव्हा मी असेन नसेन" त्याला पुढे बोलवेना आणि मलाही तिथे थांबवेना. येतो असं म्हणून मी जाण्यासाठी वळलो, माझी नजर खुंटीवर टांगलेल्या त्याच्या सदऱ्यावर पडली, त्याचा खिसा आताही फाटलेलाच होता.

नक्षत्रांचे देणे: कविवर्य मंगेश पाडगांवकर - श्रीकांत अग्निहोत्री

१० मार्च १९२९ या दिवशी बोलगाण्याचा ज्ञानेश्वर या पृथ्वीवर आणि महाराष्ट्रात वेंगुर्ला येथे कोकणात अवतरला. वयाच्या चवथ्या वर्षी पहिली कविता आणि सातत्याने ८२ वर्षे कविता लिहिणाऱ्या ह्या काव्य-सह्याद्रीसमोर नतमस्तक व्हायला हवं. अनेक कवी झाले आणि कित्येक गाजले आणि काही नावाजले. पण आढळस्थानी असणारे बोटावर मोजावे एवढेच. त्यातही स्वतःची एक वेगळी मिश्किल हलकी-फुलकी रचना पण अर्थपूर्ण भावुक संदेश देणारी शैली असणारे आणि बोलगाणी लिहिणारे एकमेव कवी, दिवंगत कविवर्य मंगेश केशव पाडगांवकर. पाडगावकरांची बोलगाणी न ऐकलेला आणि न आवडलेली व्यक्ती अवघ्या काव्य रसिकात नाही.

२५ ते ३० कविता संग्रहाचा खजिना ह्या कवीने महाराष्ट्राला नव्हे तर तमाम मराठी आणि इतर भाषिक रसिकांना बहाल केला. या व्यतिरिक्त त्यांचे मराठीत अनुवाद 'ज्युलिअस सीझर', 'रोमिओ आणि ज्युलिएट', मीरा, सूरदास आणि कबीर प्रकाशित झाले. पाडगावकरांनी नाटक आणि पुस्तके मिळून एकूण १३ पुस्तके लिहिली. परंतु हा मिश्किल कवी रमला तो मराठी कविता आणि गीतांतच. पाडगावकरांनी अनेक भावगीतेही लिहिली ती अर्थपूर्ण आणि भावपूर्ण होती आणि त्याहीपेक्षा आशयघन होती. बहुतेक भावगीते वरून शांत डोहासारखी पण भावनिक दृष्ट्या अतिशय खोल व धीरगंभीर आहेत. "या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे" हा जीवनाकडे सकारात्मक बघण्याचा दृष्टिकोन पाडगावकरांनी अतिशय सहजपणे दिला.

"जाहल्या काही चुका
अन् सूर काही राहिले,
तू दिलेले गीत माझे
आवडीने गायिले"

वरवर अनेकांना हे प्रेमातील विरह गीत भासते पण प्रत्येक शब्द, ओळी आणि कडवे नीट ऐकले तर कळते कि ह्या गीतात "तू", परमेश्वराला संबोधून आहे आणि "गीत" म्हणजे आयुष्य असा तो संदर्भ आणि अर्थ त्याला अनुषंगून आहे. जन्म ते मृत्यू अशा प्रवासाचा संदर्भ या गाण्यात आहे.

पाडगावकरांची सर्वात गाजलेले काव्य संग्रह म्हणजे जिप्सी, सलाम, गझल, बोलगाणी इत्यादी. या काव्यसंग्रहांनी मनाचा ठाव घेतला. हा कविवर्य महाराष्ट्र भूषण पुरस्कार (२००८), साहित्य अकादमी पुरस्कार (१९८०) तसेच पद्मभूषणाने (२०१३) सन्मानित झाला.

"डोळ्यात सांजवेळी आणू नकोस पाणी,
त्या दूरच्या दिव्यांना सांगू नको कहाणी "

अशी हळवी आणि मनाला विंधणारी शब्दरचना आणि "भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी, अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी" हि काळजावर ओरखडा उमटवणारी खलिश पाडगावकरांच्याच लेखणीतली.

प्रसिद्ध इंग्रजी कविता Rose is Rose is a Rose याच शैलीत मराठीत त्यांनी अजरामर कविता लिहिली. प्रेम म्हणजे काय असतं?

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं
तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं!
काय म्हणता? या ओळी चिल्लर वाटतात?

काव्याच्या दृष्टीने थिल्लर वाटतात?
असल्या तर असू दे, फसल्या तर फसू दे!
तरीसुद्धा, तरीसुद्धा
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं,
तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं!
मराठीतून इश्श म्हणून प्रेम करता येतं,
उर्दूमध्ये इश्क म्हणून प्रेम करता येतं,
व्याकरणात चुकलात तरी प्रेम करता येतं,
कॉनव्हेन्टमध्ये शिकलात तरी प्रेम करता येतं
कारण लव्ह हे त्यांचं दुसरं नेम असतं
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं ।।

हया कवितेतून प्रेम भाषा, जात, प्रांत, धर्म कशाचाच अडथळा मनात नाही, हाच संदेश पाडगावकरांनी दिला असावा. पाडगावकरांची प्रत्येक कविता आपल्याला अंतर्मुख करते आणि विचार करण्यास भाग पाडते. त्यांच्या विचारांची प्रगल्भता अनुसरण्यास प्रवृत्त करते.
एकदा त्यांची कन्या एक हिंदी सिनेगीत गुणगुणत पाडगावकरांच्या खोलीत आली कदाचित त्यांना ते रुचलं नसावं. त्यांनी मुलीला विचारलं हिंदीत गाणी का म्हणतेस? मुलगी हिरमुसली आणि म्हणाली हिंदीत गाणी चांगली असतात. १५ ते २० मिनिटांनी पाडगावकरांनी मुलीला हाक मारली आणि हातात एक कागद दिला. त्यावर लिहिले होते
दिवस तुझे हे फुलवायचे ।,
झोपाळ्यावाचून झुलायचे. ।।

या गाण्याने त्याकाळी Record Break केला. असे सहज हिंदी गाण्याच्या तोडीस तोड लिहिणारा कवी एक गीतकारही होता. पण कविता हि त्यांच्या श्वासात होती. जीवनाकडे नव्हे तर आयुष्यातल्या प्रत्येक प्रश्नांकडे व समस्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होता तर कधी थट्टेखोर होता.
त्यांचा मुलगा डॉ. अजित पाडगावकर हयांनी सांगितलेला एक प्रसंग. शेवटच्या १० वर्षात पाडगावकरांना Postherpetic neuralgia (नागिणी) चा त्रास होता. अशा परिस्थितीत हया कवीने हया त्रासावरच कविता लिहिली. आणि स्वतःच्या मुलाला त्यांच्या दवाखान्यात हि कविता पाठवली.

सोसवेना जरी नागिणीचा दाह
तरी घट्ट मोह जगण्याचा
मरणाला हाक जरी या ओठात
तरी हि पोटात भूक चळे
जरी बुडू आले, जगण्याचे तारू
संध्याकाळी दारू हाक घाली
कसा घ्यावा येथे जगण्याचा शोध
केवळ विनोद जन्म मृत्यु ।।

किती लिहावे या कवी बद्दल. सहज कविता, बोलगाणी लिहिणारे पाडगावकर एक समृद्ध गीतकारही होते, गझलकारही होते.

“या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे” असं सकारात्मक, उत्साहवर्धक तत्व सांगणारा तत्वज्ञानीही होता, तर कधी “शुक्रतारा मंद वारा चांदणे पाण्यातले” पाहणारा हा शायर मराठी काव्यक्षेत्रात ध्रुव ताऱ्यासारखा अढळपदी विराजमान झाला.

१० मार्च हा या महान कवीचा जन्मदिवस म्हणूनच या महान कवी, गीतकार आणि गझलकाराला ही मानवंदना.

While growing back in India, my parents use to take me with them for yoga classes. I was around 5+ years old. I never liked it but I did not had option at that time. Teacher who use to come from Delhi to teach this special yoga classes once a year was very strict. He would warn me the consequences of not coming to the class. He would say I know your parent and where you live. That fear created a strict discipline of waking up early for practice and after few months of practice naturally I started enjoying my practice and rest is the history.

Yoga is now practised in every country. It has spread very quickly because of its many benefits.
Yoga teaches us non-violence, truthfulness, cleanliness, happiness through many different techniques e.g. concentration, meditation and asanas. Regular practice of yoga and meditation helps us keep emotional well-being, mental strength, mental focus & healthier body.

Most of the asanas (poses) are linked with Nature, Animals, Solar system and hindu god's e.g. Sun Salutation, Tree pose, Mountain Pose, Fish pose, Moon salutation, Hanuman Aasna, Natarajasana etc. Each asana (pose) has specific benefits and story for its name.

Disclaimer: You should consult your physician or other health care professional before starting this to determine if it is right for your needs.

Surya Namaskar (sun salutation)
Surya Namaskar is done during sunrise with empty stomach. It was done for worshiping & honoring Surya God as the source of energy for earth. Sun salutation is sequence of poses to prepare our body for asana practice or full body warm. During sun salutation we use lungs to inhale and exhale more complete.

Benefits
Muscular relief.
Improves digestion system.
Improves functions for kidney, heart and lung.
Helps maintain right weight either by reducing or increasing.
Helps keep anxiety and stress at bay.
Improves Sleep & Immune system.
Improves flexibility of spine and other limbs.
Builds strength in body.

THE SUN SALUTATION



1. exhale 2. inhale

3. exhale 4. inhale 5. retain



6. exhale 7. inhale 8. exhale



9. inhale 10. exhale 11. inhale 12. exhale, inhale and begin again at 1.

आरोग्य: "आयुर्वेद काय सांगते?" - सौ. अंजली कुलकर्णी

अन्न हे पूर्णब्रह्म । ही उक्ती ऐकली की आपल्या डोळ्यासमोर येते ती 'झी' टीव्ही वरील मालिका 'आम्ही सारे खवय्ये'!
हा आहे माध्यमांचा आणि आधुनिक जीवनशैलीचा परिणाम. परंतु जेव्हा खरोखर स्वास्थ्याविषयी विचार करण्याची वेळ येते तेव्हा असंख्य वैचारिक गोंधळ, आहारशास्त्राविषयी बदललेल्या कल्पना यांमुळे 'ब्रह्माण्ड' आठवायची वेळ येते.
आयुर्वेद शास्त्रात आहार विषयक नियम, देश, काळ, मात्रा, ऋतूनुसार आहार याचे विस्त्रृत वर्णन आढळते. चला जाणून घेऊया आयुर्वेदातील आहारशास्त्र :
यौगिक तत्वज्ञानात आपले शरीर हा 'अन्नमय कोष' आहे असे म्हटले आहे. या अन्नमय कोषाचे भरण, पोषण, वर्धन आणि रस-रक्तादी सप्तधातू निर्मिती अन्नापासून क्रमाक्रमाने होत असते.
कोणतेही शास्त्र जाणून घेण्यासाठी आणि ते शास्त्र सर्वसामान्य जीवनात अनुसरण्यासाठी तीन ढोबळ मार्ग आचार्यांनी सांगितले आहेत.
१. श्रवण (ऐकणे)
२. मनन (विचार करणे)
३. निधिध्यास (वारंवार एखादी गोष्ट करून तिच्यात सुधारणा करणे)
आता आहारशास्त्राचे हे नियम कसे लागू होतात हे बघूया:

१. श्रवण (ऐकणे) - आहार किती घ्यावा? हा मूलभूत प्रश्न आपल्याला नेहमी पडतो आणि आत्ताच्या 'झिरो फिगर वेट लॉस' च्या जमान्यात तर हा 'यक्ष' प्रश्न आहे. याचे साधे उत्तर या नियमात बसवता येते. किती खावे याचे उत्तर 'कुठे थांबावे' हे कळले की बरोबर मिळते. आणि कुठे थांबावे हे जाणणारा आपला महागुरू आहे आपले उदर (पोट), पचनसंस्था.
तर वाचकहो आपल्या ज्ञानेंद्रियांचे श्रवण करा.

२. मनन - यामध्ये आपल्याला काय खाऊन त्रास होतो इथपासून 'मेनू प्लॅनिंग' पर्यंत तसेच 'देश, काळ, ऋतू'नुसार आहार कसा असावा, अशा विविध गोष्टिंचा समावेश होऊ शकतो (महत्वाचा).

३. तिसरा म्हणजे 'निधिध्यास', म्हणजेच चांगल्या गोष्टी स्विकारून त्याचा सर्वसामान्य आयुष्यात सतत अंगीकार करणे आणि शक्य असल्यास सुधारणा करणे.

मंडळी चला तर मग पुढील लेखापर्यंत हे तीनही नियम पाळण्याचा संकल्प करूया.
- पोटभर जेवण्यापेक्षा दोन घास कमी जेवूया.
- दुसऱ्या दिवशीची न्याहरी, दुपारचे भोजन आणि संध्याकाळचे जेवण यांचे वेळापत्रक बनवूया.
- अत्यंत महत्वाचे म्हणजे वरील दोनही नियम आठवड्यातील पाच वेळा तरी पाळूया.

या साध्या सोप्या मार्गाचा अवलंब करून करूया आरोग्यसंपन्न स्वास्थ्याकडे वाटचाल.
शुभंभवतु ॥

Follow this recipe for health-boosting burger.

Raw ingredients
50g Brown rice
50g Quinoa
50g Mixed lentils

Burger ingredients
1 tbsp ground sunflower seeds
1 tbsp ground almond + cashew
1 tbsp olive oil
Pinch of freshly ground black pepper, salt, cayenne pepper and turmeric

Step 1
Pressure cook raw ingredients.

Step 2
To make burger place all the raw ingredients and burger ingredients in a mixing bowl and stir to combine. 2-5 spoons of besan flour or corn flour to hold the mixture together. If needed include additional salt and cayenne pepper.

Step 3
Shape the mixture into four equal-sized patties with your hands. Bake/Grill the burgers under a preheated hot grill/oven for 15 minutes, or until completely baked, turning once to twice.

Step 4
Serve each burger pattie with two slices of multigrain bread and

- handful lettuce
- slice of tomato
- slice of red onion

कविमन: आम्हाला काय येते - मेघा शिवेकर

भाजीचा रंग, पोळीचा गोल साधता येतो आम्हाला,

पण कॅनव्हॉस वरची रंगाची उधळण करता येते आम्हाला.
आपल्या मुलांच्या मागे दिवसभर ओरडतोच,
पण गाण्यासाठी लागणारी सुरेल तानही देता येते आम्हाला.
दररोजची पोळी भाजी येतेच आम्हाला,
पण वेगवेगळ्या देशांचे खाद्यपदार्थ बनवता येतात आम्हाला.
नटुन- थटून मुरडणे भलतेच आवडते आम्हाला,
पण पदर खोचून घरालाही सुशोभित करता येते आम्हाला.
खरेदी करणं आमचा छंद नव्हे; जन्मसिद्ध हक्कच आहे,
पण वेळ प्रसंगी मदतीला येईल एवढी बचत करता येतेच आम्हाला.
घरातली कामे करताना तारेवरची कसरत करतोच आम्ही,
पण तालावर नृत्याविष्कारही करता येतात आम्हाला.
आमच्या दागदागिन्यांवर जीवापाड प्रेम करतोच आम्ही,
पण टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तूही बनवता येतात आम्हाला.
संसाराचं शिक्षण न घेताही त्यात पारंगत झालोच आम्ही,
पण टेकनॉलॉजी, सायन्स अशा क्षेत्रातही प्राविण्य मिळवता येते आम्हाला.
मुलांच्या विकासाला बाधक झाडे खुडता येतात आम्हाला,
तसेच कलेवर प्रेम करत कवितेचे चार शब्दही जोडता येतात आम्हाला.
हेच आहे वास्तव, असंच आहे आमचं अस्तित्व,
हेच आहे आमचं व्यक्तिमत्व, हेच आहे आमचं 'स्त्रीत्व'!

बघ जरा वाचून

कठोर त्या देहामध्ये आहे एक कोमल हृदय आतून, बघ जरा पारखून...
तीक्ष्ण त्या शब्दांमध्ये आहे अपार माया ओथंबून, बघ जरा ऐकून...
दुरावलेल्या त्या नात्यांमध्ये आहे तोच ओलावा भरून, बघ जरा स्पर्शून...
हरवलेल्या त्या मैत्रीमध्ये आहे गहन ओढ अजून, बघ जरा समजून...
गमावलेल्या त्या सहवासामध्ये आहेत कित्येक आठवणी गजबजून, बघ जरा आठवून...
हरवलेल्या त्या यशामध्ये आहे एक संधी दडून, बघ जरा निरखून...
परिधानलेल्या त्या मुखवट्यांमागे आहे एक खरेपणा लपून, बघ जरा उलगडून...
दगडातही दिसेल तो कृष्ण सावळा तुला, श्रद्धेने तू बघ जरा झुकून...

A Journey on the spiritual path

Faith was hidden somewhere just like the sun hides behind the clouds
Unknowingly, it somehow managed to come out...
With the faith, came the words, covered with a silky rough cover
Beautifully and painfully, they started revealing their true color...
True color was hard to see, I thus shielded myself with the shallow me
Words were then just an information, where dispassion meant grief and control meant suppression forever...
This time, with a harder stroke, life was pushed into a vacuum
Helpless without the service and peace, it failed to move out...
Now there came many soft, warm hands to pull it out
Though immature, this time, it did not fail to recognize the one who was actually helping out...
Though distracted, the transformation started happening
The faith was becoming stronger, like the glittering gold, when put through a fire...
Courage dawned, which pushed all the inhibitions out
Embracing the true self with gratitude and proud...
Dispassion was now accompanied by passion
and Control was now nothing but an awareness with patience...
Finally, the resistance was overcome and nobody was held guilty
This is how words turned into a knowledge and path turned into a reality...

कविमन: जिंदगी का पथ - मिलिंद झोडगे

जिंदगीके पथपे कई मोड आते है
ऊस ठहराव मे कुछ दोस्त मिल जाते है
और जिंदगीभर के लिये साथ जुड जाते है

होने लगती है फिर पार्टियाँ और हंसी वाले दिन आते है,
उस हंसी मज़ाक में हम ये भूल जाते है के ये तो सिर्फ एक ठहराओ है मंजिल नहीं

फिर जिंदगी अपना रुख लेती है और हमें खुशियोंके साथ कुछ दुःख देती है
और हम जिंदगीके पथ पे चले जाते है चले जाते है

लेकिन उदास न होना मेरे दोस्तों, इस जिंदगीके पथ पे आगे बढ़ते जाओ
हर एक मोड़ का मजा लेते जाओ
जो दोस्त छूटे है पीछे उनको यादो भरते जाओ

देखना जरूर बिच बीचमे पीछे मुड़के ये पथ का नजारा
उसकी रंगीनयाको मन में भरते जाओ और
जिंदगी के पथ पर चलते जाओ चलते जाओ

बालविश्व- Paintings

Fairy: A painting by **Trisha Patwardhan**.

Trisha is 8 yrs old and attends 3rd grade at butterfield Canyon Elementary School. Her hobbies are drawing, painting, making new friends and singing.



Einstein: A painting by **Sidhant Patwardhan**.

Sidhant is 12 yrs old and attends 7rd grade at Fort Herriman Middle School. His hobbies are drawing, painting, swimming, skiing, reading and playing video games.



Sharpie drawings by **Shravya Harnekar**. Shravya uses sharpie permanent markers to draw her favourite characters, its not easy as there is no chance for any error as lines cannot be erased. Amazing right?

बालविश्व- Paintings

Paintings by **Anjali Sutar**.

Anjali is an accomplished artist. She is very good at drawing and painting. She also likes to dance and is a choreographer herself.





Paintings by **Ishika Sutar**.

Ishika likes to draw, paint, dance and make new friends.

सूचना - दिलेल्या माहिती नुसार खालील चौरस भरा

1	2	3	4
5	6	7	8
9	10	11	12
13	14	15	16

1) √100 + (6 x 2)
2) $X^2 = 144$
3) (6 x 2) + 6
4) -4 + (13 x 7)
5) (8 x 9) + 7
6) 7^{th} prime no
7) $\sqrt[3]{27}$ + (3 x 2)
8) 5^2
9) 9 x $\sum_{i=1}^{4} i$
10) 30 - (2 x 3)
11) (8 x 10) + 9
12) 4^2
13) 8^{th} prime no
14) (√64 x 10) + (5 +1)
15) 12 x 2 -1
16) 5^{th} prime

हा चौरस तुम्हाला कुठल्याही सामान्य चौरसासारखा दिसेल, पण त्याची खासियत आहे की त्याच्या कुठल्याही आडव्या रांगेची बेरीज १३९ आहे. त्याच प्रमाणे त्याच्या उभ्या व तिरक्या रांगांची बेरीज सुद्धा १३९ आहे. तसेच या चौरसाची अजून काही तथ्ये आहेत.

- चौकोन २, ५, १२ आणि १५ यांची बेरीज पण १३९ आहे.
- चौकोन ३, ९, ८ व १४ ची बेरीज सुद्धा १३९ आहे.
- मधले चार चौकोन (६, ७, १० व ११) यांची पण १३९
- असेच चौकोन (१, २, ५, ६), (३, ४, ७, ८), (९, १०, १३, १४), (११, १२, १५, १६), (५, ६, ९, १०) व (७, ८, ११, १२) यांची बेरीज पण १३९ आहे.

हा चौरस भारताचे थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांनी तयार केला आहे. त्यांचा वाढदिवस होता २२ डिसेंबर १८८७, म्हणजेच २२. १२. १८८७ जी या चौरसाची पहिली आडवी रांग आहे.
रामानुजन यांचा हा एकच शोध नसून त्यांचे अनेक शोध 'गणितीय विश्लेषण', 'संख्या सिद्धांत', 'असीम मालीका' व 'सतत अपूर्णांक' या शाखांमध्ये आहेत.

शास्त्रज्ञांची नावे शोधा

मे	न्डे	ल	रा	जू	मा	न्य	ते	को	मि	मा
अ	चा	भा	ऱ्य	फॅ	आ	बौ	धा	य	न	ले
ई	स्ट	मा	स्क	टै	णे	र	वा	लै	जी	ही
डी	रा	फै	र्को	रा	स	फो	स्म	ब	फो	ते
प	भ्र	थॅ	ले	वि	चा	ए	क्स	नी	रं	ब्ली
स	या	ण	रो	प्त	ध	र्य	प्लो	झ	णी	ना
भा	हा	ला	ई	र	म्ह	चा	ण्ड	र	द	ही
आ	र्कि	मे	डी	स	डे	रा	मा	नु	ज	न
र्य	ती	र्की	न	णी	गु	वी	ई	ऱ्य	रा	ब्ली
भ	रा	भा	ला	जी	र्को	हा	न्ती	का	घा	थॉ
ट्ट	मा	फॅ	र	डे	भा	मा	न्टे	ले	ला	म्स
मा	भी	स्था	न	ई	डे	को	र्को	न्ट	क	न
सु	क्रे	के	रॅ	टी	फ्स	कौ	ट्ट	नी	दे	चा
का	ऱ्य	न्स	न	क्रो	स्टो	ब्स	र	थॉ	त्रै	प्य
स्क	क्र	ता	बी	की	मा	प	नु	ओ	अं	मे
रा	स्टो	ई	र्ट	गो	को	गु	ब्र	ह्म	गु	प्त

मेन्डेल
आर्यभट्ट
आर्किमेडीस
बौधायन
भास्कराचार्य
लैबनीझ
फॅरडे
रामानुजन
ब्रह्मगुप्त
माहावीराचार्य
माक्रोनी
थॉम्सन
क्रेन्स